रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २२२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालन्यात ऑनलाईन चक्री सट्ट्याचा हाहाकार

## ५ लाखांची लूट, तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न; सदर बाजार पोलिसांच्या निकाष्क्रियतेवर संताप





**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात अवैध ऑनलाईन चक्री सट्ट्याने एका मध्यमवर्गीय कुटुंबाचे आयुष्य उद्‌ध्वस्त केले आहे. या जुगाराच्या विळख्यात अडकलेल्या लालबाग भागातील एका ३५ वर्षीय तरुणाने तब्बल ५ लाख ३२ हजार रुपये गमावल्यानंतर, सट्टा चालकांच्या जाचाला कंटाळून आत्मदहनाचा प्रयत्न केला. या धक्कादायक घटनेने शहरात खळबळ उडाली असून, भरवस्तीत चालणाऱ्या या अवैध धंद्यांकडे सदर बाजार पोलिसांचे होत असलेले दुर्लक्ष आता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

**५ लाखांची लूट आणि सोन्याची राखरांगोळी**

मिळालेल्या माहितीनुसार, लालबाग परिसरातील रहिवासी शेख अशफाक (वय ३५) याला शहरातील सट्टा माफियांच्या टोळीने जास्तीच्या पैशाचे आमिष दाखवून चक्री सट्ट्याच्या जाळ्यात ओढले. गेल्या सहा महिन्यांत अशफाकने या सट्ट्यात स्वतःची सर्व पुंजी गमावली. सट्टा चालवणाऱ्यांच्या दबावाखाली त्याने: पत्नीची सोन्याची पोत (११,८५० रु.) आणि नेकलेस (८८,००० रु.) घरातून चोरून बँकेत गहाण ठेवले. स्वतः ची हक्काची विस्टा कार मातीमोल भावात विकली. मोंढ्यात कष्टाने कमावलेले सर्व पैसे या जुगारात स्वाहा केले.

**हतबल होऊन आत्महत्येचा प्रयत्न**

६ एप्रिल रोजी जेव्हा सर्व मार्ग संपले, तेव्हा नैराश्यातून अशफाकने घरात स्वतःवर पेट्रोल ओतून पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. नशिबाने त्याची ७३ वर्षीय वृद्ध माता जैतुनबी शेख हमीद आणि पत्नीने वेळीच धाव घेतल्याने त्याचा जीव वाचला. मात्र, यामुळे या कुटुंबातील दहशतीचे वातावरण समोर आले आहे.

**''आम्ही पोलिसांना हप्ता देतो''; सट्टा माफियांची मुजोरी**

पीडित मातेने पोलीस अधीक्षकांना दिलेल्या तक्रार अर्जात सट्टा माफियांच्या मुजोरीचा पाढाच वाचला आहे. काळे चौक, चंदनझिरा आणि देऊळगाव राजा येथील सट्टा चालक केवळ पैसे उकळून थांबले नाहीत, तर ते आता अशफाकचा प्लॉट विकण्यासाठी दबाव टाकत आहेत. ''आम्ही पोलिसांना महिन्याला लाखो रुपये हप्ता देतो, आमचं कोणी काही वाकडं करू शकत नाही,'' अशी उघड धमकी हे सट्टा माफिया देत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

**सदर बाजार पोलीस निकाष्क्रिय का?**

जालना शहराचा मुख्य भाग असलेल्या सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत हे सट्टा केंद्र सर्रासपणे सुरू आहेत. नागरिकांचा असा आरोप आहे की भरवस्तीत धंदे: गल्लोगल्ली ऑनलाईन चक्री सट्ट्याचे अड्डे सुरू असताना पोलीस गस्त नेमकी कुठे असते? तक्रारीकडे दुर्लक्षः कुटुंबाने वारंवार मदतीची याचना करूनही स्थानिक स्तरावर ठोस कारवाई का झाली नाही? हप्ता संस्कृतीची चर्चाः सट्टा माफियांच्या हप्ता देण्याच्या दाव्यामुळे पोलिसांच्या प्रतिमेला तडा जात असून, यामागे खरोखरच वरदहस्त आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

**वृद्ध मातेची न्यायासाठी आर्त हाक**

७३ वर्षीय जैतुनबी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे न्यायाची गुहार लावली आहे. ''आम्ही मोलमजुरी करून पोट भरतो. या सट्ट्याने आमचे हसते-खेळते घर उद्‌ध्वस्त केले. माझ्या मुलाला आत्महत्येसाठी प्रवृत्त करणाऱ्यांना अटक करा आणि आमचे गेलेले दागिने परत मिळवून द्या,'' अशी कळकळीची विनंती त्यांनी केली आहे. आता या प्रकरणी पोलीस अधीक्षक काय पावले उचलतात आणि स्थानिक पोलिसांच्या कथित निष्क्रियतेवर काय कारवाई होते, याकडे संपूर्ण जालन्याचे लक्ष लागले आहे.

---

### मनपा विरोधी पक्षनेते कमलेश खरे आक्रमक

## भाजपाच्या नगरसेवकावर दादागिरीचा आणि निधी पळवल्याचा गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या सभागृहात सत्ताधारी भाजप नगरसेवक आणि विरोधी पक्षातील शिवसेना नगरसेवकांमध्ये तीव्र वादावादी झाल्याचे समोर आले आहे. शिवसेनेचे नगरसेवक कमलेश खरे यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजप नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांच्यावर सभागृहात दादागिरी करत असल्याचा आणि विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे.

६ तारखेला झालेल्या सभेत महात्मा फ ुले मार्केटच्या विषयावर चर्चा सुरू असताना, अक्षय



गोरंट्याल यांनी शिवसेनेच्या नगरसेवकांना उद्देशून उद्धट भाषा वापरली आणि त्यांना खाली बस

**पान २ वर**

---

### जालन्यातील लक्कडकोट येथील जमीन वादाने पेटले रान

## कटके यांच्याकडून पोलीस व राजकारण्यांवर गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या लक्कडकोट चौकातील एका जमिनीच्या वादावरून आता मोठा संघर्ष उभा ठाकला आहे. ही जमीन कायदेशीररित्या आपलीच असतानाही, काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी तेथील फलक आणि बॅनरची तोडफोड केली असून, यामागे मोठे राजकीय षडयंत्र असल्याचा खळबळजनक आरोप संजय कटके यांनी एका पत्रकार परिषदेत केला आहे. या प्रसंगो जयश्री कटके यांना अश्रू अनावर झाले असून त्यांनी आपल्या कुटुंबाच्या जीवितास धोका असल्याचेही सांगितले.

**नेमका प्रकार काय?**

लक्कडकोट चौकातील संबंधित जमीन जयश्री कटके यांनी खरेदी केलेली असून, भूमी अभिलेख कार्यालयापासून ते मंत्रालयापर्यंतच्या सर्व शासकीय कागदपत्रांवर मालक आणि कब्जेदार म्हणून त्यांचेच नाव आहे. पीआर कार्डवरही त्यांचीच नोंद आहे. असे असतानाही, शुक्रवारी (दि. १०) काही समाजकंटकांनी या जागेवरील गेटचे बोर्ड तोडले आणि बॅनर फाडून टाकले. हा सर्व प्रकार सुनील राठी व अनिल मालपाणी यांच्या सांगण्यावरून सुरू असल्याचा आरोप कटके यांनी केला आहे.

**उच्च न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न?**

पत्रकार परिषदेत माहिती देताना संजय कटके म्हणाले की, जालना तहसीलदारांच्या आदेशाला सुनील राठी व अनिल मालपाणी यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. न्यायालयात आपला ताबा सिद्ध करण्यासाठी सुनील राठी व अनिल मालपाणी हे गुंड प्रवृत्तीच्या लोकांच्या मदतीने या जमिनीवर ताबा घेण्याचा प्रयत्न करत आहेत. ''आमचा या जागेवर १९७४ पासून ताबा आहे, अगदी लाईट बिल सुद्धा आमच्याच नावे आहे. सर्व चौकशीत ही जागा आमचीच असल्याचे स्पष्ट झाले असतानाही न्यायालयाची दिशाभूल करण्यासाठी हा खटाटोप केला

**पान २ वर**

---

## सर्वसमावेशक नेतृत्वाची बुलंद तोफ

### अरविंदराव देशमुख यांच्या संघर्षाची शासन दखल घेणार का?

**जालना । प्रतिनिधी** - राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील असलेल्या जालना जिल्ह्यात सध्या एका नेतृत्वाची चर्चा जोर धरत आहे, ते म्हणजे मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव देशमुख. केवळ एका समाजापुरते मर्यादित न राहता १८ पगड जातींना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली असून, त्यांच्या कार्याची दखल आता शासन स्तरावर, विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**केवळ समाज नाही, तर माणुसकी केंद्रबिंदू**

अरविंदराव देशमुख हे मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष असले तरी, त्यांचे कार्यक्षेत्र कोणत्याही एका जातीपुरते मर्यादित राहिलेले नाही. गोरगरीब, कष्टकरी आणि वंचितांच्या न्यायासाठी ते सदैव तत्पर असतात. मग तो शेतकरी आत्महत्येचा प्रश्न असो किंवा सर्वसामान्यांची शासकीय दरबारी होणारी अडवणूक, देशमुख तिथे स्वतः हजर राहून प्रश्न तडीस नेतात. यामुळेच जिल्ह्यातील बहुजन आणि



अठरा पगड जातींमध्ये त्यांच्याबद्दल आदराची भावना आहे.

**संघर्षातून जन्मलेले नेतृत्वः अंगावर झेलले गुन्हे**

देशमुख यांचा सामाजिक प्रवासाचा मार्ग हा फुलांचा नाही, तर काट्यांचा राहिला आहे. समाजाच्या हक्कासाठी लढा देताना त्यांनी आजवर अनेकदा पोलीस लाठ्याकाठ्या आणि तुरुंगवासही भोगला आहे. अनेक गुन्हे दाखलः जनआंदोलने आणि सार्वजनिक प्रश्नांवर आवाज उठवल्यामुळे त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल झाले आहेत.

समर्थकांची भावनाः कार्यकर्त्यांच्या मते, हे गुन्हे नसून त्यांच्या संघर्षाची ती ''मानचिन्हे'' आहेत. स्वार्थासाठी नव्हे, तर समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी हे खटले अंगावर ओढून घेतले आहेत.

मुख्यमंत्री महोदयांकडे जनतेची ही मागणी जालना जिल्ह्याच्या सामाजिक वीण घट्ट ठेवण्यात देशमुख यांचा मोठा वाटा आहे. अशा निस्वार्थी आणि लढाऊ नेतृत्वाला योग्य तो शासकीय सन्मान किंवा स्थान मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ''अरविंदराव देशमुख हे संघर्षाचे प्रतीक आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्याचा आवाका पाहून त्यांची दखल घ्यावी आणि त्यांना योग्य तो सन्मान द्यावा,'' अशी भावना त्यांचे मित्रपरिवार आणि असंख्य कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

**काळाची गरजः**

**सर्वसमावेशक चेहरा**

आजच्या काळात जेव्हा जाती-पातीच्या राजकारणाने वातावरण ढवळून निघाले आहे, अशा वेळी सर्व समाजातील नागरिकांना आपल्या हक्काचा माणूस म्हणून अरविंदराव देशमुख यांच्यात एक विश्वास दिसतो. ''धावून जाणारे नेतृत्व'' ही प्रतिमा त्यांनी मागील अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण कामातून कमावली आहे.

**लोकसंपर्कः जालना जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात दांडगा जनसंपर्क**

आक्रमक पण संयमीः प्रश्नांची मांडणी करताना आक्रमकता आणि सोडवताना संयम.

निस्वार्थ सेवाः पद असो वा नसो, सर्वसामान्यांच्या कामासाठी सदैव उपलब्ध.

जालना जिल्ह्याच्या सामाजिक समतेसाठी अहोरात्र झटणाऱ्या या नेतृत्वाकडे आता सरकार कशा पद्धतीने बघते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



# अमृत महोत्सवात आठवणींना उजाळा : प्रा. वडजे यांचा सन्मान सोहळा

**जालना । प्रतिनिधी -** शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे ज्येष्ठ प्राध्यापक विश्वंभर वडजे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला 'अमृत महोत्सव' सोहळा अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात प्रा. वडजे यांच्या जीवनप्रवासातील प्रेरणादायी आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला जालना विधानसभेचे आमदार अर्जुनराव खोतकर, मा. राजेशभैया टोपे, मा. अरविंद चव्हाण, मा. भास्कर आंबेकर, श्री अंकुशराव राऊत ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख प्राचार्य चंद्रसेन कोठावळे प्राचार्य गणेश अग्निहोत्री, श्रीमती विमलताई आगलावे, श्री राजेंद्र गोरे, प्रा. बी. वाय. कुलकर्णी, प्रा. मधुकर जोशी, डी. के. मोरे, सौ. संध्या देठे, शिक्षण अधिकारी बाळासाहेब खरात नागेश मापारी, विपुल भागवत तसेच माजी शिक्षणाधिकारी एन. के. देशमुख प्रा. सोपानराव तेलगड, श्री पंडितदादा भुतेकर पत्रकार भरत मानकर श्री दिलीपराव बानायत यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमाची सुरुवात सौ. विनया वडजे बानायत यांनी प्रभावी प्रास्ताविक करून केली. त्यांनी प्रा. वडजे यांच्या जीवनप्रवासाचा आढावा घेत त्यांच्या संघर्षमय वाटचालीचे आणि कुटुंबवत्सल स्वभावाचे मनोगत मांडले. कार्यक्रमाचे सुंदर आणि नेटक्या शब्दांत







सूत्रसंचालन सौ. मनीषा पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन विवेक वडजे यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून प्रा. वडजे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडले. ''प्रामाणिकपणा, शिस्त, वेळेचे काटेकोर नियोजन आणि विद्यार्थ्यांप्रती अपार प्रेम'' ही त्यांची वैशिष्ट्ये असल्याचे सर्वांनी नमूद केले. ग्रामीण भागाशी घट्ट नाळ जोडलेला आणि 'हाडाचा शिक्षक' म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडवले असल्याचे गौरवोद्गार काढण्यात आले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन नोकरी मिळवून, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य करत त्यांनी समाजात आदर्श निर्माण केला. कुटुंबीयांनाही उत्तम शिक्षण देऊन यशस्वी करण्यामागे त्यांचा मोठा वाटा असल्याचे अनेकांनी अधोरेखित केले. महाविद्यालयीन कार्यकाळात त्यांनी केलेल्या शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाचेही विशेष कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.गांधी बानायत श्री विशाल वडजे, श्री कैलास चाळसे , श्री कांतराव शेलगावकर तसेच सर्व नातेवाईक, मित्रमंडळी आणि शुभेच्छुकांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले. संपूर्ण सोहळा आनंद, कृतज्ञता आणि सन्मानाच्या भावनांनी ओतप्रोत भरलेला होता.

## सेवा निवृत्त शिक्षक व कर्मचारी यांचे आळंदी येथे राज्य अधिवेशन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य सेवा निवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटना यांचे राज्य स्तरीय अधिवेशन एप्रिल च्या शेवटी आळंदी जिल्हा पुणे येथे संपन्न होणार आहे. अधिवेशनाची तयारी श्री जंगम राज्य अध्यक्ष हे पाहत असून अधिवेशनास सर्व सेवा निवृत्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन जालना तालुका अध्यक्ष लाजरस आल्हाट, सुरेश रगडे, अता मोहम्मद बक्षी, कैलास भिसे,एम एम जाधव,त्रिलोक आडेकर,रांजेद्रकुमार जत्ती, इत्यादींनी केले आहे



पान १ वरुन

## कटके यांच्याकडून ...

जात आहे,'' असेही त्यांनी नमूद केले.

**पोलीस प्रशासन आणि राजकीय दबावाचा आरोप**

या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. या तोडफोडीबाबत सदर बाजार पोलीस ठाण्यात रितसर तक्रार देऊनही पोलिसांनी अद्याप कोणतीही दखल घेतलेली नाही. यात एका बड्या राजकीय व्यक्तीचा हस्तक्षेप असून, त्या व्यक्तीकडून कटके कुटुंबाला धमकावले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ''एका राजकीय व्यक्तीने मालपाणी यांना ३ कोटी रुपये द्या, म्हणजे जमीन तुमचीच राहील, असा प्रस्ताव दिल्याचे'' धक्कादायक विधानही यावेळी करण्यात आले.

**जयश्री कटके यांना अश्रू अनावर**

पत्रकार परिषदेत उपस्थित असलेल्या जयश्री कटके अत्यंत भावूक झाल्या होत्या. ''मी माझी आयुष्यभराची पुंजी आणि माझ्या लग्न झालेल्या मुलींचे दागदागिने विकून ही जमीन खरेदी केली आहे. आता गुंड प्रवृत्तीच्या लोकांपासून मला, माझ्या पतीला आणि मुलाला जीवे मारण्याचा धोका निर्माण झाला आहे,'' असे सांगताना त्यांना रडू कोसळले. न्याय हक्कासाठी लढत असताना प्रशासन आणि राजकारणी एकत्र येऊन छळ करत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

लक्कडकोट चौकातील या जमिनीच्या वादामुळे जालन्यात सध्या तणावाचे वातावरण असून, आता पोलीस प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## भाजपाच्या नगरसेवकावर ...

असे म्हणत गप्प करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप खरे यांनी केला आहे. गोरंट्याल हे प्रस्थापित राजकीय कुटुंबातील असल्याने ते नवीन नगरसेवकांचा आवाज दाबत असल्याचे त्यांनी नमूद केले

भाजप नगरसेवकांनी सभागृहात चुकीची माहिती देऊन शिवसेना व्यापाऱ्यांच्या विरोधात असल्याचे चित्र उभे केले, असा दावा शिवसेनेने केला आहे. प्रत्यक्षात शिवसेनेनेच या मार्केटच्या नवीन इमारतीसाठी पाठपुरावा केला होता, असे कमलेश खरे यांनी स्पष्ट केले.

भाजप मध्ये नव्याने प्रवेश केलेल्यानी महायुतीचे वातावरण गढूळ केले आहे, या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना महानगर पालिकेतील सर्व प्रकार सांगणार असल्याचेही शिवसेनेच्या नगर सेवकांनी स्पष्ट केले आहे.

**निधी पळविला - नगरसेवक निखिल पगारे**

यांनी गंभीर आरोप केला की, दलित वस्तीच्या विकासासाठी आलेला १६ कोटी रुपयांचा निधी सत्ताधाऱ्यांनी इतर वसाहतींकडे वळवला आहे. यासंदर्भात आयुक्तांकडे तक्रार केली असता त्यांनी ''हा तुमचा अंतर्गत विषय आहे'' असे बेजबाबदार उत्तर दिल्याचेही पगारे यांनी सांगितले.

शिवसेनेच्या काळात शहराला तिसऱ्या दिवशी पाणी मिळत होते, मात्र आता पाणी पुरवठ्याची स्थिती बिकट झाली असून नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्याचा आरोप दुर्गेश कठोटीवाले यांनी केला.

विकासकामांकडे दुर्लक्षः सत्ताधारी पक्ष विकासकामांवर चर्चा करण्याऐवजी विरोधकांना एकरी भाषेत बोलून अपमानित करण्यात मग्न आहे. अक्षय गोरंट्याल हे महापौर आणि सभापतींनाही मध्येच टोकतात, ज्यामुळे सभागृहाचे कामकाज विस्कळीत होत असल्याचा आरोप या पत्रकार परिषदेत करण्यात आला आहे.

या सर्व प्रकारामुळे जालना महानगरपालिकेत भाजपच्या नव्या आणि जुन्या नगरसेवकांमधील अंतर्गत वाद आणि शिवसेनेची आक्रमक भूमिका चव्हाट्यावर आली आहे.

आमदार रोहित पवारांच्या पाठपुराव्याला मोठे यश;

# मोहरी धरणाच्या दुरुस्तीसाठी धरण सुरक्षा समिती सोमवारी मोहरी मध्ये!

### खर्डा परिसरातील १० गावांच्या पाण्याचा प्रश्न सुटणार; पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याचे प्रशासनाचे आश्वासन

**जामखेड । प्रतिनिधी -** जामखेड तालुक्याची जीवनवाहिनी असलेल्या मोहरी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या दुरुस्तीचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. आमदार रोहित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर प्रशासनाला जाग आली असून, येत्या सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी धरण सुरक्षा आढावा समिती मोहरी धरणाची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याचे आश्वासन महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिले आहे.

**पुढारी ते अधिकारी : असा झाला निर्णय**

मोहरी धरणाच्या भिंतीला पडलेले भगदाड आणि सांडव्याची झालेली दुरवस्था याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विजयसिंह गोलेकर यांनी आमदार रोहित पवार यांना निवेदन दिले होते. पवार यांनी तातडीने कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत धुमाळ यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून पत्राद्वारे तातडीच्या कार्यवाहीची मागणी केली. यानंतर जलसंपदा विभागाच्या कृष्णा खोरे प्रकल्पाचे मुख्य अभियंता संजीव चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

**काय करणार ही समिती?**

सोमवारी येणारी ही उच्चस्तरीय तांत्रिक समिती धरणातील गळती, माती भराव, सांडव्याची दुरवस्था आणि कालव्यांची पाहणी करेल. धरणाची सुरक्षा मानके ठरवणे, आपत्कालीन योजना आखणे आणि धरणाखालील गावांचे संरक्षण करणे ही या समितीची मुख्य जबाबदारी आहे. या समितीच्या अहवालानंतर तातडीने मजबुतीकरणाच्या कामाला सुरुवात होणार आहे.

**श्रेयवादाच्या लढाईत शेतकऱ्यांचे नुकसान**

गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे भगदाड पडले असता आमदार रोहित पवार यांनी स्वखर्चाने आवश्यक मशिनरी, जेसीबी लावून काम सुरू केले होते. मात्र, सत्ताधाऱ्यांनी तांत्रिक कारणे पुढे करत



आणि श्रेयवादापोटी हे काम थांबवल्याचा आरोप राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. ''स्वतः काही करायचे नाही आणि दुसरा करत असेल तर खोडा घालायचा, या वृत्तीमुळे पाणी वाया गेले आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाले,'' अशी टीका विजयसिंह गोलेकर यांनी केली आहे.

*का महत्त्वाचे आहे मोहरी धरण?*

-१० गावांना आधार: खर्डा या मोठ्या गावासह परिसरातील १० गावांची तहान या धरणावर अवलंबून आहे.

-दुष्काळातील तारणहार: संपूर्ण तालुक्याला टँकरमुक्त करण्यासाठी मोहरी तलावाचा पाणीसाठा अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

-शेतीला संजीवनी: तेलंगशी, जायभायवाडी, मोहरी, खर्डा, गवळवाडी, पांढरेवाडी परिसरातील शेती या प्रकल्पावर अवलंबून आहे.

मोहरी धरणाची सुरक्षा हा हजारो ग्रामस्थांच्या जीवनाचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न आहे. प्रशासनाने आता कागदी घोडे न नाचवता प्रत्यक्ष कामाला वेग द्यावा. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण न झाल्यास ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जावे लागेल अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांनी दिली आहे.



# माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांचा जागर

## संदीप खरात यांच्या वतीने रुग्णांना फळवाटप

**जालना | प्रतिनिधी -** जालना विधानसभेचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. याच शृंखलेचा भाग म्हणून आज, शुक्रवार (दि. १०) रोजी पँथर रिपब्लिकन पार्टीचे संदीप खरात यांच्या पुढाकारातून जालना येथील शासकीय सामान्य रुग्णालयात (जिल्हा रुग्णालय) रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या प्रमाणात फळवाटप करण्यात आले. वाढदिवसाचा बडेजाव टाळून रुग्णसेवेचा हा सामाजिक उपक्रम राबवल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. मागील चार दिवसांपासून कैलास गोरंट्याल यांचा वाढदिवस विविध विधायक कामांनी साजरा केला जात आहे. आज दुपारी ४ वाजता शासकीय रुग्णालयात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी संदीप खरात आणि त्यांच्या टीमने रुग्णांची विचारपूस करत त्यांना फळांचे वाटप केले. रुग्णालयातील समस्या आणि गोरंट्याल यांची भूमिका या प्रसंगी कैलास गोरंट्याल यांनी माध्यमांशी संवाद साधला. संदीप खरात व त्यांच्या सहकाऱ्यांनी राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.



## एमआरआय मशीनच्या प्रश्नावर आरोग्यमंत्र्यांशी चर्चा करणार कैलास गोरंट्याल यांचे आश्वासन

रुग्णालयात फळवाटप करत असताना अनेक रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी गोरंट्याल यांच्याकडे रुग्णालयातील असुविधांबाबत तक्रारी केल्या. यामध्ये प्रामुख्याने एमआरआय () मशीनचा अभाव असल्यामुळे गोरगरीब रुग्णांची मोठी गैरसोय होत असल्याचे समोर आले. या गंभीर प्रश्नावर बोलताना कैलास गोरंट्याल म्हणाले की, ''शासकीय रुग्णालयात एमआरआय मशीन असणे ही काळाची गरज आहे.

यासंदर्भात मी लवकरच राज्याच्या आरोग्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा करणार आहे. तसेच येत्या दोन-तीन दिवसांत मुख्यमंत्री यांची भेट होणार असून, त्यांच्यासमोरही हा विषय मांडून घाटी रुग्णालय आणि जालन्यातील आरोग्य सुविधांसाठी एमआरआय मशीनचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करेन.'' जिल्हा शल्यचिकित्सकांकडून सत्कार या कार्यक्रमादरम्यान जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी कैलास गोरंट्याल यांचा वाढदिवसानिमित्त शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन यथोचित सत्कार केला व त्यांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या सामाजिक उपक्रमावेळी पँथर रिपब्लिकन पार्टीचे संदीप खरात यांच्यासह रितेश चौधरी, राहुल खरात, आलोक सरोडेकर, अविनाश काकडे, सुभाष जाधव, गंगावणे दादा, वाघमारे दादा, भगवान पालवे, बापू निकम, गजेंद्र ठाकूर, सागर मेहका, विशाल रूपवते, संजय हिवराळे, राहुल मांगधरे, मनोज झिने, अतिश टायगर आणि इतर अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिद्धार्थ महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १८ तास अखंड वाचन उपक्रमाचे आयोजन



**जाफ्राबाद | दत्ता देशमुख -** येथिल सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून १८ तास अखंड पुस्तक वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राहुलजी म्हस्के म्हस्के यांनी या उपक्रमाचे उद्घाटन केले. यावेळी प्राचार्य डॉ राहुलजी म्हस्के म्हणाले की,बाबासाहेबांच्या अफाट व्यासंग आणि अभ्यासू वृत्तीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थी आणि संशोधकांनी सलग १८ तास एकाग्रतेने विविध विषयांवरील पुस्तकांचे वाचन करावे,या निमित्ताने महाविद्यालयाच्या ऐतिहासिक ग्रंथालयातील बाबासाहेबांच्या हस्तलिखितांचे आणि दुर्मिळ ग्रंथांचे दर्शन घेण्याची संधी उपस्थितांना मिळेल. या उपक्रमाचे आयोजन ग्रंथपाल प्रा.अशोक पठाडे यांच्या नेतृत्वाखाली ग्रंथालय समितीने आणि विभागाने केले होते. सूत्रसंचालन डॉ संतोष पहारे यांनी केले तर आभार प्रा. मनीष बनकर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्रसिद्ध प्रमुख प्रा अनिल वैद्य यांचीही उपस्थिती होती.या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## पीपल्स को-ऑप बँकेच्या शाखा सल्लागार समितीत विलास छबूसाजी खानापुरे यांची नियुक्ती

**जालना | प्रतिनिधी -** जालना पीपल्स को-ऑप. बँक लि., जालना यांच्या वतीने श्री. विलास छबूसाजी खानापुरे यांची बँकेच्या जालना शाखेच्या सल्लागार समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, त्यानुसार श्री खानापुरे यांची नियुक्ती दि. ०१ मार्च २०२६ ते दि. २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीसाठी करण्यात आली आहे. बँकेच्या वतीने अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे की, त्यांनी शाखेच्या ठेवी, कर्ज व्यवसाय व



बचत खात्यांच्या वाढीसाठी प्रयत्न करून शाखेच्या विकास व प्रगतीस हातभार लावावा.

ही नियुक्ती पत्र बँकेचे चेअरमन संजय पी.मुथा यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले आहे.

## जालना जिल्हा सिलंबमची ताकद दाखवली ५००० हून अधिक मुलांना प्रशिक्षण, नविन टीम मैदानात

**जालना | प्रतिनिधी -** जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशनची वार्षिक जिल्हा बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत मागील वर्षाचा कार्य अहवाल सादर करण्यात आला तसेच नविन जिल्हा कार्यकारणीची अधिकृत घोषणा करण्यात आली. बैठकीदरम्यान संघटनेच्या गेल्या एका वर्षातील विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. कार्य अहवालात नमूद केल्यानुसार, जिल्हाभरात आयोजित करण्यात आलेल्या विविध समर कॅम्प, प्रशिक्षण शिबिरे व कार्यशाळांच्या माध्यमातून ५००० पेक्षा अधिक मुला-मुलींना सिलंबम मार्दनी खेळाचे प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्याचे सांगण्यात आले.



संघटनेच्या कार्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास व आत्मसंरक्षणाची भावना विकसित होत असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. विशेषतः मुलींना स्वसंरक्षणासाठी सक्षम बनवण्याच्या दृष्टीने सिलंबम प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. नवीन जिल्हा कार्यकारणी पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली :

अध्यक्ष भूषण यादव उपाध्यक्ष:- अजय सरकटे, गजानन क्षीरसागर, प्रा.डॉ. अक्षय तनपुरे,किरणराजे देशमुख, दिपाली कुलकर्णी, नंदा अवधूत. सचिव प्रा.डॉ. नितिन भक्त सहसचिव:-ओम धोका, धरमसिंह ठाकुर, सीमाताई गंगाधरे, विनोद कुमावत महिला अध्यक्षा वैशाली बियाणी महिला सचिव दर्शना अर्जुनराव खोतकर सल्लागार :- डॉ रितेश अग्रवाल आरोग्य सल्लागार, गणेश राउत कायदे सल्लागार, विनोद वीर वरिष्ठ सल्लागार,योगिता मनवर वरिष्ठ महिला सल्लागार ,किरण झारकंडे युवा सल्लागार, उषा पवार क्रीडा सल्लागार समन्वयक:- सुयोग खरडेकर,मीडिया समन्वयक, विजय कमले पाटिल मीडिया समन्वयक, सुनील नरवड़े मीडिया समन्वयक, नागेश बेनीवाल मीडिया समन्वयक, निवांत नंदाने युवा समन्वयक,प्रेरणा जींरग महिला समन्वयक प्रसिद्धि प्रमुख :- दीपक शेळके महिला प्रशिक्षण प्रमुख:- प्रतीक्षा दब्बडवार परतुर तालुका प्रमुख:- रोहित माणिक जैस्वाल सदस्य:- साक्षी दुग्गड़, पूनम रोडिया यावेळी नविन कार्यकारणी जाहिर करण्यात आली असून, आगामी काळात जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर अधिकाधिक खेळाडू घडवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. तसेच येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणावर स्पर्धा व प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्याचा निर्धारही बैठकीत व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास संघटनेचे पदाधिकारी, प्रशिक्षक, खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजाभाऊ देशमुख यांनी जालना जिल्ह्यातील काँग्रेस पक्ष रसातळाला नेला जिल्हाध्यक्षदावरून हकालपट्टी करा - नंदा पवार

**जालना | प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील काँग्रेस पक्ष रसातळाला नेणारे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी जातीयद्वेषातून आपल्यावर पक्ष निलंबनाची कारवाई केली असून काँग्रेस पक्षाने निष्क्रिय जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांची पक्षातून हकालपट्टी करावी. आज जालना येथे एका पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना नंदा पवार म्हणाल्या की, काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गणेश पाटील यांनी माझे जे निलंबन केले ते चुकीचे आणि बेकायदेशीर आहे. माझ्यावरती जे बिन बुडाचे आरोप केले आहेत ते सर्व खोटे आहेत. जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी मला रीतसर पत्र द्यायचे होते. माझा खुलासा मागविणे अपेक्षित होते. त्यांनी जाणीवपूर्वक मी मागासवर्गीय महिला असल्यामुळे माझ्यावर अन्याय केला आहे . काँग्रेस पक्षाचे



जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी जिल्ह्यातील काँग्रेस पार रसा तळाला नेली आहे. राजाभाऊ देशमुख जिल्हाध्यक्ष झाल्यापासून त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेसला भाजप आणि शिंदे शिवसेनाच्या दावणीला बांधल्यामुळे काँग्रेस पक्षाचे जिल्ह्यात पतन झाले आहे, राजाभाऊ देशमुख हे जातीवादी असल्यामुळे निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्ष सोडला आहे, त्यांनी केवळ भोकरदनची नगरपालिका आपल्या ताब्यात राहण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री व भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे पाटील यांच्या सांगण्यावरून काम करत गेले. यामुळे काँग्रेस पक्षाची खूप मोठी हानी झाली आहे.

भाजप आणि शिंदे शिवसेना गट यांच्या सांगण्यावरून आर्थिक देणे घेणे करून नगरपालिका व महानगरपालिका निवडणुकीत तिकीट विकले. काँग्रेस पक्षात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यावर यांनी अन्याय केला आहे. राजाभाऊ देशमुख हे जातीवादी असल्यामुळे मागासवर्गीय, मुस्लिम- ओबीसी समाजातील कार्यकर्त्यांवर अन्याय केला मी मागासवर्गीय समाजाची असल्यामुळे महानगर पालिकेच्या निवडणुकीत तिकीटासाठी मी पैसे देऊ शकत नसल्यामुळे जाणीवपूर्वक माझे तिकीट कापण्याचे प्रयत्न केला व माझ्या विरोधात पैसे घेऊन शिंदे गटाचा उमेदवार उभा करून मला जाणीवपूर्वक पराभव केला.

महिला काँग्रेसची जिल्हाअध्यक्ष झाल्यापासून प्रभाग क्रमांक चार मध्ये व जालना शहर व जिल्ह्यामध्ये मी काँग्रेसचे महिला संघटन उभे केले. यामुळे मला पक्षाने मला माझ्या प्रभाग क्रमांक चार मध्ये उमेदवारी दिली मात्र जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, अतिकखान यांनी रातोरात मुंबईला जाऊन प्रदेश उपाध्यक्ष गणेश पाटील यांना माझ्याबद्दल खोटी व चुकीची माहिती देऊन मला दिलेली उमेदवारी रद्द करण्याचे पत्र आणले व माझ्या प्रभाग क्रमांक चार मध्ये जाणीवपूर्वक ते पत्र सगळीकडे व्हायरल केले .मला जालना महानगरपालिका निवडणुकीमध्ये जाणीवपूर्वक पाडले. मी १००% टक्के निवडून येणार होते.

गणेश पाटील यांच्या पत्राचा आधार घेऊन माझ्या विरोधात प्रभाग क्रमांक चार मध्ये सभा घेऊन मला पाडले व घरोघर जाऊन माझ्या विरोधात प्रचार केला. गणेश पाटील, राजाभाऊ देशमुख यांनी एका मागासवर्गीय महिलेच्या विरोधात इतके जातीवादी धोरण घेऊन माझा पराभव केला. माझ्या पराभवास गणेश पाटील, राजाभाऊ देशमुख, हे जबाबदार आहेत.

राजाभाऊ देशमुख यांनी जालना जिल्ह्यामध्ये काँग्रेस मातीत घातली असून राजाभाऊ देशमुख यांना जिल्हा अध्यक्षपदावर राहण्याचा काही अधिकार नाही ,त्यांची तात्काळ जिल्हाध्यक्षपदावरून हकलपट्टी करावी, अशी मागणी आपण काँग्रेस पक्ष श्रेष्ठीकडे करणार आहोत.

## जाफ्राबाद ते शिर्डी राजुर बस सेवा तात्काळ सुरुवात करावी मागणी

**जाफ्राबाद | दत्ता देशमुख -** जाफ्राबाद तालुक्यातील भाविकांची गैरसोय लक्षात घेऊन तिर्थक्षेत्र असलेल्या शिर्डी राजुरेश्वर गणपती मातूतिर्थी राजमाता जिजाऊ जन्मस्थळ सिंदखेडराजा बस सेवा सुरू करून पर्यटक क्षेत्रातील माहिती मिळावी म्हणून निवेदन सादर... परिवह महामंडळ यांनी गाव तेथे लाल परी सुरुवात करावी म्हणून घोष वाक्य असलेल्या शब्दाना उजाळा द्यावा.



जाफ्राबाद बस आगार होऊन पंचवीस वर्षे झाली ओपनिंग च्या दरम्यान तिर्थक्षेत्र शिर्डी बस सेवा नियमितपणे सुरू झाली होती... परंतू नवीन येत असलेल्या आगार प्रमुख यांनी ही बस सेवा बंद केल्याने भाविकांची श्रद्धा असलेल्या देवस्थानच्या बससेवा चालू करण्यात याव्यात म्हणून तारीख ८एप्रिल रोजी मंहमंद बय्यास ऋषीकेश पैठणकर बाबासाहेब गव्हले यांनी जाफ्राबाद आगार प्रमुख राजपूत साहाय्य आगार प्रमुख पंडित यांची भेट घेऊन एका निवेदनाद्वारे तिर्थक्षेत्र असलेल्या शिर्डी तीर्थक्षेत्र राजुरेश्वर गणपती राजमाता जिजाऊ जन्मस्थळ सिंदखेडराजा बस सेवा तातडीने सुरुवात करून भाविकांची होणारी गैरसोय दुर करावी अशी मागणी दिलेल्या निवेदनात केली आहे सदरील एक निवेदन परिवहनमंत्री महाराष्ट्र राज्य यांना सुध्दा ईमेलद्वारे करण्यात आले आहे... याकडे तातडीने कार्यवाही करण्यात यावी अशी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे...निवेदनावर मंहमंद बय्यास बाळासाहेब गव्हले ऋषीकेश पैठणकर यांच्या सह अनेक भाविकांच्या सह्या आहे

## जालना जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.कृष्णकांत कनवारिया यांचा प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने जाहीर सत्कार



**जाफ्राबाद | दत्ता देशमुख -** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने आज दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी जालना जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.कृष्णकांत कनवारिया यांचा प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.

यावेळी शिक्षण क्षेत्रात सर्वजण मिळून जिल्ह्यातील गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करूया असे आवाहन साहेबांनी केले.

यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष श्री बाबासाहेब जुंबड, जिल्हा सरचिटणीस श्री.दिलीप जायभाये, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष श्री.सुभाष भडांगे , श्री. मंता फुके, श्री सुधाकर पवार, श्री जगन्नाथ शिंदे, श्री राजू खरात, श्री प्रमोद पवार, श्री प्रकाश गिरी, श्री.सुखदेव खरात, श्री देव कराळे, इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवतेसाठी सामाजिक लढे उभारले - प्रो. डॉ.सतीश ठोंबरे

### सिद्धार्थ महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व्याख्यानमालेचे चौथे पुष्प अर्पण

**जाफ्राबाद | दत्ता देशमुख -** दिनांक ०७/०४/२०२६,येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व्याख्यानमालेचे चौथे पुष्प अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल म्हस्के होते तर प्रमुख वक्ते प्रोफेसर डॉ.सतीश ठोंबरे उपप्राचार्य प्रो.डॉ.सुनील मेढे उपप्राचार्य डॉ.श्याम सर्जे कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्रचार्य विनोद हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख वक्ते प्रो.डॉ.सतीश ठोंबरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक व राजकीय विचार यावर आपले व्याख्यान दिले. डॉ.ठोंबरे म्हणाले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील मानव हा केंद्रबिंदू मानून स्पृश्य,अस्पृश्यता हा भेदभाव नष्ट करण्यासाठी अनेक सामाजिक लढे उभे केले या लढ्यामुळे विशिष्ट जातीलाच फायदा न होता भारतातील अनेक जुनाट रूढी परंपरा मोडीत काढून एक सुदृढ समाज निर्मिती झाली . तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अंधश्रद्धेचे मूळ कारण अज्ञान असून हे अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षण घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ८ जुलै १९४५ रोजी मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र त्यांनी या संस्थेच्या माध्यमातून दिला तसेच सिद्धार्थ महाविद्यालय मुंबई,मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद या महाविद्यालयाची स्थापना करून उच्च शिक्षणाची दारे सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी खुली केली तसेच २० जुलै १९२४ रोजी




बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन केली व या माध्यमातून दलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे आणि त्यांचे सामाजिक आर्थिक स्थिती सुधारणे हा उद्देश ठेवला.भारतीय राज्यघटनेत समता स्वातंत्र्य,बंधुता,अधिकार आणि कर्तव्य यांचा समावेश करून भारतातील प्रत्येक नागरिकाला समान पातळीवर आणण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले असल्याचे सांगितले.अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल भाऊ म्हस्के यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त व्याख्यानमालेत विविध विषयांवर सखोल अभ्यास करून प्रमुख वक्ते आपले व्याख्यान देत आहेत त्यामुळे आपल्या मनातील काही चुकीच्या संकल्पना दूर होऊन भविष्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांविषयी चे आपले मत अभ्यासपूर्ण निर्माण होईल व त्याचा फायदा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर समाजातील इतर घटकांनाही होईल आणि खऱ्या अर्थाने हेच ह्या व्याख्यानमालेचे फलित राहील असे अध्यक्षीय समारोपात सांगितले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो. डॉ.मनोज पगारे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.सरिता मणियार यांनी मानले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# फुले-शाहू-आंबेडकर विचारांचा ध्यास

## संतोष जमदाडे यांच्या कार्याची दखल कधी?

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील माळी महासंघाचे राष्ट्रीय सचिव संतोष जमदाडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून केवळ जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात स्वतःचे संघटन उभे करून सामाजिक चळवळीला बळकटी दिली आहे. त्यांनी विविध स्तरांवर पदाधिकारी निर्माण करत फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार राज्यभर करण्याचे सातत्यपूर्ण काम केले आहे.

समाजातील जातीय भेद बाजूला ठेवत समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाचा संदेश पोहोचवणे हेच त्यांचे ध्येय राहिले आहे. विविध सामाजिक प्रश्नांवर त्यांनी आंदोलनांची धुरा सांभाळत वंचित घटकांसाठी आवाज उठवला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली उभी राहिलेली अनेक आंदोलनं राज्यभर गाजली असून त्यातून सामाजिक प्रश्नांवर लक्ष वेधले गेले आहे.



संतोष जमदाडे यांच्या कार्यातील एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे सावित्रीबाई फुले यांच्या नावासाठी केलेले ऐतिहासिक उपोषण. पुणे येथील गांधी चमन येथे केलेले हे उपोषण तब्बल आठ दिवस सुरू होते. या आंदोलनाची दखल घेत तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे यांना कॅबिनेटची बैठक सोडून उपोषणस्थळी यावे लागले. त्यानंतर अवघ्या पंधरा दिवसांत या मागणीला यश मिळाले आणि पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात आले.

जालना जिल्ह्यात असे प्रभावी नेतृत्व जन्माला आले, ज्यांनी निस्वार्थपणे फुले-शाहू-आंबेडकर विचारांचा प्रसार केला. मात्र, आजच्या घडीला "गल्लीत दगड उचलला की नेता जन्माला येतो" अशी परिस्थिती निर्माण झाली असून, या विचारांचा केवळ नावापुरता वापर करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

खऱ्या अर्थाने समाजासाठी झटणाऱ्या आणि विचारांशी प्रामाणिक राहणाऱ्या संतोष जमदाडे यांसारख्या कार्यकर्त्यांना योग्य तो सन्मान आणि न्याय कधी मिळणार, असा सवाल आता फुले-शाहू-आंबेडकर विचारांच्या अनुयायांकडून उपस्थित केला जात आहे. त्यांच्या कार्याची योग्य दखल घेऊन अशा नेतृत्वाला प्रोत्साहन देणे हीच काळाची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# जातीय व्यवस्थेचे समूळ उच्चाटन हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अंतिम ध्येय होते इतिहासकार डॉ. रतनलाल यांचे प्रतिपादन

**जालना । प्रतिनिधी -**या देशातील जातीय व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अंतिम ध्येय होते आणि आजच्या परिस्थितीत त्यांचे विचार अधिकच समर्पक ठरतात, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील इतिहासकार व विचारवंत डॉ. रतनलाल यांनी येथे केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफतांना ते बोलत होते. ज्येष्ठ सामाजिक नेते ॲड. शिवाजी आदमाने हे यावेळी अध्यक्षस्थानी होते. माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. भगवानसिंग ढोबाळ,डॉ कालीदास सूर्यवंशी आदींची यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. विचारमंचावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे अध्यक्ष डॉ. शांताराम रायपुरे, सचिव सुधाकर रतनराव रत्नपारखे, कार्याध्यक्ष साईनाथ चिन्नादोरे आदींची उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे महत्त्व या विषयावर विचार मांडतांना डॉ. रतनलाल पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी



आयुष्यभर समानतेवर आधारित समाजाची कल्पना मांडली. मात्र आज बहुजन या संकल्पनेचा योग्य अर्थ लावला जात नाही.

अनेक नेते बहुजन हा शब्द वापरतात, परंतु त्याचे सखोल विश्लेषण करीत नसल्याचे त्यांनी नमूद केले. या देशातील जातीय व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अंतिम ध्येय होते, मात्र फुले-शाहू-आंबेडकर यांच्या भूमीत जात व्यवस्था उध्वस्त व्हायला पाहिजे होती परंतु ती उध्वस्त होतांना दिसत नाही. बाबासाहेबांचा उदोउदो करणाऱ्यांनीसुद्धा जात व्यवस्था मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले असल्याची टीका त्यांनी केली. शूद्र जात समूहांना संघटित करून अनुयायांनी राजकारण केले असते तर या देशातील आजचे चित्र वेगळे दिसले असते, असे ते म्हणाले.

कार्ल मार्क्स, गौतम बुद्ध आणि महात्मा जोतिराव फुले यांच्याप्रमाणेच बाबासाहेबही समानतेच्या ध्येयाने प्रेरित होते.

परंतु आजच्या काळात सत्य मांडण्यास लोक घाबरत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. महापुरुषांचे दैविकरण केले जात असल्याचे ते म्हणाले. फोटोला, पुतळ्याळास वंदन केले म्हणजे कार्य संपले,महात्मा गांधी आणि बाबासाहेब यांच्यातील फरक स्पष्ट करताना ते म्हणाले की, गांधीजी अस्पृश्यता निर्मूलनावर भर देत होते तर बाबासाहेबांचे अंतिम ध्येय संपूर्ण जाती व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करणे हे होते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे विचार आत्मसात करणे तसेच शिक्षण घेऊन ज्ञानी होणे हेच तरूण पिढीने आपले ध्येय समजावे, असे आवाहनही डॉ. रतनलाल यांनी यावेळी केले.

त्यांचे परिवर्तनवादी विचार तळागाळातील समाजात पोहचवण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना ॲड. शिवाजी आदमाने म्हणाले की, वेशीच्या बाहेर असलेल्या समाजातील महिलांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या माध्यमातून शिक्षणाची संधी मिळाली आहे, वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य डॉ. आंबेडकर यांनी केले. संविधानामुळे वंचित समाज घटक आज सत्तेत सहभागी होतांना दिसत आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी चळवळीमुळेच मोठे परिवर्तन घडले असल्याचे सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला ही अनेक अडचणीवर मात करीत अविरतपणे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेते ॲड. बी. एम. साळवे,सुदामराव सदाशिवे, राम गायकवाड, अण्णा सावंत, डॉ. विजय कुमठेकर,डॉ. कार्तिक गावंडे, गयाबाई साळवे, प्रा. सत्संग मुंढे, संजय हेरकर, बबनराव रत्नपारखे, सुनील साळवे, प्रा. सुभाष देठे, सतीश वाहुळे, महेंद्र रत्नपारखे, हरेश रत्नपारखे ,दत्ता अंभोरे,पंजाब खिल्लारे,सखाराम साबळे ,मदन जाधव, सम्यक शिंदे, नितीन भालेराव यांच्यासह नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# भाडेकरूने भागीदारीच्या नावाखाली जागा दुसऱ्याला दिल्यास होणार हकालपट्टी

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

**जालना । प्रतिनिधी -** भाड्याने दिलेली जागा मूळ भाडेकरूने भागीदारीत बदल करण्याच्या नावाखाली परस्पर तिसऱ्या व्यक्तीस वापरण्यास दिल्यास तो बेकायदेशीर हस्तांतरण मानला जाईल आणि अशा भाडेकरूला जागा खाली करण्याचा आदेश दिला जाऊ शकतो, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. श्री एम.व्ही. रामचंद्र (कायदेशीर वारसांद्वारे) विरुद्ध मेसर्स महेंद्र वॉच कंपनी या खटल्यात (सिव्हिल अपील क्र. ४३५३ / २०२६) १० एप्रिल, २०२६ रोजी दिलेल्या या निकालामुळे देशभरातील जागामालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या प्रकरणात, एका दुकान मालकाने एका भागीदारी संस्थेला दुकान भाड्याने दिले होते. भाडेकरारात जागामालकाच्या लेखी परवानगीशिवाय जागा दुसऱ्याला भाड्याने देण्यास किंवा हस्तांतरित करण्यास स्पष्ट मनाई होती. काही काळानंतर, मूळ भागीदारीतील भागीदार व्यवसायातून बाहेर पडले आणि पूर्णपणे नवीन व्यक्ती दुकानाचा ताबा घेऊन व्यवसाय करू लागले.

यावर जागामालकाने बेकायदेशीर हस्तांतरणाच्या कारणास्तव भाडेकरूंना जागा खाली करण्यासाठी न्यायालयात धाव घेतली. ट्रायल कोर्टाने जागामालकाच्या बाजूने निकाल दिला, परंतु कर्नाटक उच्च न्यायालयाने तो रद्द केला. अखेर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, बेकायदेशीर हस्तांतरण सिद्ध करण्याची सुरुवातीची जबाबदारी जागामालकाची असते. मात्र, जागामालकाने हे सिद्ध केले की मूळ भाडेकरू जागेच्या ताब्यात नसून तिसरीच व्यक्ती जागेचा पूर्ण ताबा घेऊन वापर करत आहे, तर त्यानंतर हा व्यवहार कायदेशीर कसा आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी भाडेकरूवर येते. या प्रकरणात, भाडेकरू नवीन भागीदारी किंवा हस्तांतरण कायदेशीर असल्याचे सिद्ध करू शकले नाहीत. भागीदारीच्या नावाखाली केलेला हा प्रकार म्हणजे कायद्याच्या तरतुदींपासून पळवाट काढण्याचा प्रयत्न असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

या निकालावर भाष्य करताना कायदेतज्ज्ञ **ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले की, "हा निकाल मालमत्ता मालकांसाठी एक मोठा विजय आहे. अनेकदा भाडेकरू भागीदारीत बदल किंवा पुनर्रचना केल्याचा देखावा करून भाड्याची जागा परस्पर दुसऱ्याला जास्त पैशात वापरण्यास देतात. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की न्यायालय अशा व्यवहारांमागील खरा हेतू तपासू शकते.

जागामालकाला केवळ तिसऱ्या व्यक्तीचा ताबा सिद्ध करायचा आहे, त्यानंतर भाडेकरूला तो व्यवहार कायदेशीर असल्याचे सिद्ध करावे लागेल. या निर्णयामुळे भाड्याच्या जागांच्या बेकायदेशीर हस्तांतरणाला मोठा आळा बसेल आणि जागामालकांचे हक्क अधिक सुरक्षित होतील."

सर्वोच्च न्यायालयाने कर्नाटक उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करत ट्रायल कोर्टाचा भाडेकरूंना बाहेर काढण्याचा आदेश कायम ठेवला. तसेच, सध्याच्या भाडेकरूंना तीन महिन्यांच्या आत जागा रिकामी करून मालकाच्या ताब्यात देण्याचे निर्देश दिले आहेत.

## सेवा निवृत्त शिक्षक व कर्मचारी यांचे आळंदी येथे राज्य अधिवेशन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य सेवा निवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटना यांचे राज्य स्तरीय अधिवेशन



एप्रिल च्या शेवटी आळंदी जिल्हा पुणे येथे संपन्न होणार आहे. अधिवेशनाची तयारी श्री जंगम राज्य अध्यक्ष हे पाहत असून अधिवेशनास सर्व सेवा निवृत्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन जालना तालुका अध्यक्ष लाजरस आल्हाट, सुरेश रगडे, अता मोहम्मद बक्षी, कैलास भिसे,एम एम जाधव,त्रिलोक आडेकर, रांजेद्रकुमार जत्ती, इत्यादींनी केले आहे.

# परतूर नगरपालिकेची २० आर जमीन गायब; नगरसेविका सरस्वती तेलगड यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**परतुर । प्रतिनिधी -** परतूर नगरपालिकेच्या मालकीची आणि कोट्यवधी रुपये किंमत असलेली सर्वे नंबर २५८ मधील सुमारे २० आर जमीन हडप करण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नगरसेविका सौ. सरस्वती अंकुशराव तेलगड यांनी जालना जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन उच्चस्तरीय चौकशीची आणि जमिनीच्या फेर-मोजणीची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परतूर नगरपालिकेने १९९९ मध्ये सर्वे नंबर २५८ मधील ५० आर क्षेत्रफळाची जमीन खरेदी केली होती. सातबारा उताऱ्यावरही तशी अधिकृत नोंद आहे. या जागेवर नगरपालिकेला सार्वजनिक उद्यान विकसित करायचे आहे. त्या अनुषंगाने २० फेब्रुवारी २०२६ रोजी नगरपालिकेच्या स्थायी समितीने ठरावही मंजूर केला.गंभीर बाब अशी की, नगरपालिकेच्या स्थायी समितीच्या ठरावात ५० आर ऐवजी केवळ २९ आर जमिनीचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच, २० मार्च २०२४ रोजी भूमी अभिलेख कार्यालयाकडून करण्यात आलेल्या मोजणी नकाशातही केवळ ३० आर क्षेत्रफळ दर्शवण्यात आले आहे. म्हणजेच, रेकॉर्डवरील ५० आर जमिनीपैकी सुमारे २० आर जमीन कागदोपत्री किंवा प्रत्यक्षात गायब झाली आहे.या मौल्यवान जमिनीवर भूमाफियांनी डल्ला मारला असल्याची शक्यता वर्तवत, नगरसेविका सरस्वती तेलगड यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात खालील मागण्या केल्या आहेत: भूमी अभिलेख कार्यालयामार्फत या जमिनीची तात्काळ निमताना (फेरी) मोजणी करण्यात यावी. नगरपालिकेची जमीन हडप करणाऱ्या प्रवृत्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. गायब झालेली २० आर जमीन पुन्हा ताब्यात घेऊन संपूर्ण ५० आर क्षेत्रावरच भव्य उद्यान विकसित करावे.

या पत्राची प्रत मुख्याधिकारी, नगर परिषद परतूर यांनाही माहितीसाठी देण्यात आली आहे. आता या प्रकरणावर जिल्हाधिकारी काय पावले उचलतात, याकडे परतूरवासीयांचे लक्ष लागले आहे.



जालना येथीलआनंदी स्वामी गल्लीतील भैरवनाथ मंदिराच्या आई भवानी चे रूप देऊन मिरवणूक काढण्यात आली

छायाचित्र किरण खानापुरे

# माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या वाढदिवसानिमित्त गोरगरीब महिलांना साडी वाटप

**जालना । प्रतिनिधी -**माजी आमदार तथा भाजप नेते कैलास गोरंट्याल यांच्या वाढदिवसानिमित्त मस्तगड परिसरात समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात आला. नगरसेवक महावीर ढाक्का मित्र मंडळाच्या वतीने गोरगरीब महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक गरजू महिलांना दिलासा मिळाला.

कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग घेतला होता. वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा देण्यापुरते मर्यादित न राहता समाजासाठी काहीतरी करण्याचा संदेश या उपक्रमातून



देण्यात आला.

या कार्यक्रमाला माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यासह माजी नगराध्यक्षा संगीता गोरंट्याल, जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, महावीर ढाक्का, जगदीश भारतीय, मंगला गरदास, विक्रांत ढाक्का आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर गरदास, रणजीत मगरे यांच्यासह महावीर ढाक्का मित्र मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे परिसरात आनंदाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात अशा सामाजिक उपक्रमांची गरज अधोरेखित करत, वाढदिवस साजरा करण्याचा हा आदर्श मार्ग असल्याचे मत व्यक्त केले.

# महात्मा ज्योतिबा फुले यांनी सामाजिक वनवा पेटवला - मुख्याध्यापिका कुलकर्णी

**परतुर । प्रतिनिधी -** सामाजिक चळवळीचा वसा सांभाळत तत्कालीन परिस्थितीमध्ये समाज व्यवस्थेची विस्कटलेली घडी सुधारण्याच्या प्रामाणिकपणाच्या प्रयत्नात महात्मा ज्योतिबा फुले यांनी सामाजिक वनवा पेटवला असे प्रतिपादन जिल्हा परिषद शाळेच्या सिंगोणा येथील मुख्याध्यापिका कुलकर्णी मॅडम यांनी केले.

सिंगोना येथील शाळेत आयोजित महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्या बोलत होत्या यावेळी मुख्याध्यापक श्रीमती



कुलकर्णी मैडम वेढेकर सर सोईतकर मैडमसह शाळेतील सर्व शिक्षक गण व विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आपल्या भावना व्यक्त करताना कुलकर्णी मॅडम पुढे म्हणाल्या की महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्या काळामध्ये समाज सुधारणा करिता मोठे योगदान बजावले असून त्यांच्या कार्याची प्रेरणा आजच्या पिढीने देखील आत्मसात करणे गरजेचे असल्याच्या भावना शेवटी त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.